# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे — ४११०१६

☎ (०२०) २५६५६२३४

email : ropune@dtemaharashtra.gov.in website : www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/लेखा-१/२०१९/ 3545 दिनांक 27 AUG 2019

<u>तातडीचे</u>

प्रति,

**सर्व अनुदानित पदवी व पदविका संस्था.**

पुणे विभाग, पुणे

**विषय :- अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१ आणि सुधारीत अंदाज २०१९-२० (योजनेत्तर) प्रस्ताव पाठविणेबाबत.**

**संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. ७/तंशिस/अनुदान/अर्थसं/२०१९/१० दि. २०-०८-२०१९**

उपरोक्त संदर्भांकित पत्राचे अवलोकन करावे (सोबत प्रत जोडण्यात येत आहे) त्यानुसार आपल्या संस्थेच्या ईमेल पत्त्यावर पाठविण्यात आलेल्या प्रपत्रानुसार आपल्या संस्थेचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे व सदर पत्रात नमुद 'परिशिष्ट - अ' नुसार आपल्या संस्थेचे अंदाजपत्रक संचालनालयास सादर करावे व त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

प्र.सहसंचालक करीता

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रॅमर, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

C:\Old PC\all folder\Certificate\cir5.docx

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक:१९६७, मुंबई :४००००१.

दूरध्वनी- २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०,/५१ फॅक्स नं.२२६९२१०

E_mail desk7@dte maharashratra.gov.in    Web.w.w.w.dte maharashtra.gov.in

प्रथम प्राधान्य

क्रमांक :७/तंशिसं/अनुदान/अर्थसं/२०१९/८०

दिनांक : 20 AUG 2019

प्रति,

संचालक / प्राचार्य

अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये,

तंत्रशास्त्र विदयापीठ,वास्तुशास्त्र महाविद्यालये,

तंत्रनिकेतने व औषधनिर्माणशास्त्र संस्था.

विषय : अर्थसंकल्पिय अंदाज २०२०-२१ आणि सुधारीत अंदाज २०१९ -२० (योजनेतर) प्रस्ताव पाठविणेबाबत.

सर्व अशासकीय अनुदानित संस्थांचे उपरोक्त वर्षाचे अंदाजपत्रक संकलित करुन तद्संबंधीचा एकत्रित प्रस्ताव या संचालनालयातर्फे शासनास सादर करावयाचा आहे.तरी या संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थांनी त्यांच्या संस्थेचे अर्थसंकल्पिय अंदाज २०२० - २१ आणि सुधारीत अंदाज २०१९ - २० या संचालनालयास सादर करावेत व त्याची एक प्रत संबंधित विभागीय कार्यालयासही सादर करावी.

आपल्या संस्थेचे अंदाजपत्रक ज्या कर्मचा-याने / अधिका-याने तयार केलेले असेल त्यांनाच परिशिष्ठ 'अ' मध्ये संस्थेसाठी दर्शविलेल्या तारीख व वेळेनुसार संचालनालयास सादर करण्याकरीता पाठविण्यात यावे. सदर परिशिष्ठ व अंदाजपत्रकासाठी विहीत करण्यात आलेली प्रपत्रे इमेलव्दारे संस्थेच्या इमेल पत्त्यावर पाठविण्यात आली आहेत.

संस्थेचे अंदाजपत्रक सादर करताना विहीत प्रपत्रात तयार केलेले अंदाजपत्रक टपालाने न पाठवता ते ज्या कर्मचा-याने / अधिका-याने तयार केलेले आहे, त्याचप्रमाणे ज्यांना अर्थसंकल्पाबाबतचे ज्ञान अवगत आहे अशा कर्मचा-यांसोबतच *परिशिष्ठ 'अ' मध्ये* आपल्या संस्थेस निश्चित करुन दिलेल्या तारखेस व वेळेस या संचालनालयास सादर करावयाचे आहे. विहीत मुदतीनंतर आलेले अंदाजपत्रक कुठल्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाही किंवा संस्थेसाठीच्या अनुदान तरतुदीसाठीचा अंदाजपत्रक प्रस्ताव शासनास सादर केला जाणार नाही. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुखांवर राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
2 2 AUG 2019
आवक क्र. 8030

सदरचे अंदाजपत्रक पाठवितांना खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या बाबी लक्षात घेऊन अंदाजपत्रक तयार केलेले असावे.

१. ज्या प्रपत्रातील माहिती अपूर्ण किंवा चुकीची आढळेल ते प्रपत्र स्विकारले जाणार नाही. तसेच सर्व प्रपत्रातील आकडे हे हजारात दर्शविण्यात यावेत. *पूर्ण रुपयात आकडेवारी सादर करण्यात येऊ नये.* अशा पध्दतीने प्रपत्रे भरुन आणली असतील तर ते अंदाजपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

२. शासनाच्या दि.१.०४.२००४ च्या शासन निर्णयान्वये संस्थेसाठी मंजूर असलेली पदे व नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पदांपैकी भरलेल्या पदांची माहिती प्रपत्र ३ वेतन भरलेली पदे त्याचप्रमाणे संस्थेस मंजूर असलेल्या पदांपैकी रिक्त पदांची माहिती प्रपत्र वेतन (३-१) दि.१४.०१.२००३ च्या शासन निर्णयान्वये अतिरीक्त ठरविण्यात आलेली परंतू सद्यस्थितील त्या पदावर कार्यरत अधिसंख्य पदांची माहिती एकत्रित करुन प्रपत्र (३-२) मध्ये दर्शविण्यात यावी.

३. ज्या पदांचा मंजूर पदांमध्ये व अतिरिक्त पदांमध्ये समावेश करण्यात आलेला नाही अशा पदांबाबतची माहिती स्वतंत्ररित्या विहीत नमुन्यात सादर करण्यात यावी.

४. सदरचा प्रस्ताव पाठवितांना वेळोवेळी लागू होणा-या महागाई भत्त्याची वाढ दर्शविण्यात यावी.त्याचप्रमाणे इतर बाबींवर होणा-या वाढीचाही विचार करण्यात यावा.

५. आश्वासित प्रगती योजना, वरिष्ठ श्रेणी / निवड श्रेणी बाबावत देय ठरणाऱ्या थकबाकी रकमांचा समावेश करून त्याचे स्वतंत्र विवरणपत्रदेखील जोडावे.

६. वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेले असल्यास त्या रकमांचा देखिल अंतर्भूत करण्यात यावा.

७. वेतनेत्तर खर्च ग्राह्य असलेल्या बाबींबाबत व अनुदान खर्चाच्या मर्यादेत निगडील दर्शविण्यात यावा.सोबत विवरणपत्र जोडावे.

८. भाडेपट्टी व कर आणि विमा इत्यादी मान्य दरानुसारच देण्यात यावा.

९. कर्मचा-यांचे भ.नि.नि.वर्गणी जमा,परतावा व व्याज तसेच डीसीपीएस योजनेच्या कर्मचा-यांचा हिस्सा व शासन हिस्सा व व्याज माहीतीसुदधा अचुक सादर करावी.सदर माहीती Excel format सॉफ्ट कॉपी सादर करावी.

१०. महागाई भत्ता सुधारीत अंदाजासाठी २० टक्के व अर्थसंकल्पीय अंदाजासाठी महागाई भत्ता २५ टक्के गृहीत धरूनच अंदाजपत्रक सादर करावे.

वर दिलेल्या सूचनांप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून ते या कार्यालयास दिलेल्या वेळेत सादर करावे अन्यथा उशिराने प्राप्त झालेले अंदाजपत्रक स्विकारले जाणार नाही याची पुन्हा जाणीव करुन देण्यात येत आहे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई

प्रत:- माहिती व पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थांना संचालनालयाने विहीत केलेल्या तारखेस अंदाजपत्रक सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात तसेच या सोबत जोडण्यात आलेली विहीत प्रपत्रे संस्थांना आपल्या स्तरावर उपलब्ध करुन देण्यात यावीत. व अर्थसंकल्पिय अंदाज प्रत प्राप्त करून घेवून तपासणी करून अहवाल सादर करावा

# परिशिष्ट-अ

अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक सादर करावयाचे वेळापत्रक

| अंदाजपत्रक सादर करावयाची तारीख | अ.क्र. | संस्थेचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| ३/९/२०१९ | १ | व्ही.जे.टी. आय.मुंबई | सकाळी १०.३० |
| | २ | सोफिया पॉलिटेक्निक,मुंबई | दुपारी १२.०० |
| | ३ | के.एम.कुंदनानी कॉलेज ऑफ फार्मसी,उल्हासनगर | दुपारी ३.०० |
| | ४ | ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर, मुंबई | दुपारी ४.०० |
| ४/९/२०१९ | १ | एम.एच.साबुसिध्दीक पॉलिटेक्निक मुंबई | सकाळी १०.३० |
| | २ | ॲग्नेल टेक्निकल कॉलेज,मुंबई | दुपारी १२.०० |
| | ३ | के.जे.सोमय्या पॉलिटेक्निक,मुंबई | दुपारी ३.०० |
| | ४ | बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी, मुंबई | दुपारी ४.०० |
| ५/९/२०१९ | १ | सी.यु.शहा कॉलेज ऑफ फार्मसी,मुंबई | सकाळी १०.३० |
| | २ | कुंदनानी कॉलेज ऑफ फार्मसी,मुंबई | दुपारी १२.०० |
| | ३ | एस.पी. कॉलेज ऑफ इंजि.,मुंबई | दुपारी ३.०० |
| | ४ | प्रेमलिला विठ्ठलदास पॉलिटेक्निक मुंबई | दुपारी ४.०० |
| ६/९/२०१९ | १ | नांदेड फार्मसी कॉलेज (पॉली),नांदेड | सकाळी १०.३० |
| | २ | महाराष्ट्र पॉलिटेक्निक इन्स्टि.निलंगा,लातूर | सकाळी १२.०० |
| | ३ | कुसरो वाडिया इन्स्टि.ऑफ टेक्नॉ.पुणे | दुपारी ३.०० |
| | ४ | कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिक | दुपारी ४.०० |
| ७/९/२०१९ | १ | डॉ.पंजाबराव देशमुख पॉलि.,अमरावती | सकाळी १०.३० |
| | २ | इन्स्टि.ऑफ डिप्लोमा इन फार्मसी,बोरगाव,वर्धा | सकाळी १२.०० |
| | ३ | इन्स्टि.ऑफ फार्मसी,(पॉलि.)सोलापूर | दुपारी ३.०० |
| | ४ | इन्स्टि.ऑफ फार्मसी,मिरज | दुपारी ४.०० |
| ९/९/२०१९ | १ | शिवाजी इन्स्टि.ऑफ फार्मसी,परभणी | सकाळी १०.३० |
| | २ | इन्स्टि.ऑफ सिव्हिल ॲंड रुरल इंजि. गारगोटी | सकाळी १२.०० |
| | ३ | प्रवरा रुरल कॉलेज ऑफ फार्मसी (पदवीका),अहमदनगर. | दुपारी ३.०० |
| | ४ | कमला नेहरु पॉलिटेक्निक (फार्मसी),औरंगाबाद | दुपारी ४.०० |
| ११/९/२०१९ | १ | आचार्य श्रीमन्नारायण तंत्र संस्था पिपरी,वर्धा. | सकाळी १०.३० |
| | २ | महाराष्ट्र इन्स्टि.ऑफ प्रिंटींग टेक्नॉ.पुणे | सकाळी १२.०० |
| | ३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था,नागपूर | दुपारी ३.०० |
| | ४ | वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रशिक्षण संस्था, नागपूर | दुपारी ४.०० |
| १६/९/२०१९ | १ | डिप्लोमा इन फार्मसी इन्स्टि.,उस्मानाबाद | सकाळी १०.३० |
| | २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे रायगड | दुपारी १२.०० |
| | ३ | पेट्रो- केमिकल इंजिनिअरिंग,रायगड | दुपारी ३.०० |
| | ४ | रासगिरा,वरळी,मुंबई | दुपारी ४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १७/९/२०१९ | १ | चन्नबसवेश्वर (पॉली.) कॉलेज,लातूर | सकाळी १०.३० |
| | २ | इन्स्टि.ऑफ फार्मसी,गढी गेवराई,बीड | दुपारी १२.०० |
| | ३ | श्री.एस.एस.पाटील इन्स्टि.ऑफ टेक्सॉ.जळगांव, | दुपारी ३.०० |
| | ४ | गुरुगोविंदसिंग कॉलेज ऑफ इंजि.नांदेड | दुपारी ४.०० |
| १८/९/२०१९<br>१८/०९/२०१९ | १ | वालचंद इंजि.कॉलेज, सांगली | सकाळी १०.३० |
| | २ | सेंट झेविअर्स टेक्निकल,मुंबई | सकाळी १२.०० |
| | ३ | पुणे कॉलेज ऑफ फार्मसी,पुणे | दुपारी ३.०० |
| | ४ | इन्स्टि.ऑफ फार्मसी (पॉलि.)पुणे | दुपारी ४.०० |
| १९/९/२०१९ | १ | सर.जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई | सकाळी १०.३० |
| | २ | रसायन तंत्रशास्त्र संस्था, माटुंगा, मुंबई | सकाळी १२.०० |
| | ३ | इन्स्टि.ऑफ फार्मसी,मालेगाव,नाशिक | दुपारी ३.०० |
| | ४ | डी.ई.सोसायटी टेक्निकल इन्स्टि.पुणे | दुपारी ४.०० |
| २०/९/२०१९ | १ | इन्स्टि.ऑफ फार्मसी,उजळवाडी,कोल्हापूर | सकाळी १०.३० |
| | २ | श्रीम.कुसुमताई वानखेडे इन्स्टि.ऑफ फार्मसी, काटोल | सकाळी १२.०० |
| | ३ | शीतादेवी खंडेलवाल इन्स्टि.ऑफ फार्मसी,अकोला. | दुपारी ३.०० |
| | ४ | वुमेन्स टेक्नि.एज्यूकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टि.नागपूर | दुपारी ४.०० |
| २१/९/२०१९ | १ | एस.वी.एम.पॉलिटेक्निक,मुंबई | सकाळी १०.३० |
| | २ | कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,पुणे | सकाळी १२.०० |